RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ६८(३)] शुक्रवार, मे ८, २०२६/वैशाख १८, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे, २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३.**

क्रमांक मेसमा-०३२५/प्र.क्र.-११०/ऊर्जा-४.— ज्याअर्थी, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) नुसार अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड, तिरोडा, जि. गोंदिया हे पारेषण व निर्मिती करणारे परवानेधारक (यापुढे ज्यास 'सदर परवानेधारक' असे संबोधण्यात आले आहे) हे महाराष्ट्र राज्यामध्ये वीज पुरवठा करण्याबाबतच्या सेवांमध्ये व्यस्त आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर परवानेधारक कंपनीचे कर्मचारी संपावर जाण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ च्या (सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९) कलम २ च्या खंड (क) च्या उप खंड (दोन) अन्वये, वीज पुरवठ्याशी संबंधित असलेली कोणतीही सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर परवानेधारक कंपनीच्या अत्यावश्यक सेवेमध्ये संप करण्यास प्रतिबंध करणे सार्वजनिक हितास्तव आवश्यक आहे, अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ च्या (सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९) कलम ४ च्या उप कलम (१) यासह कलम २ च्या खंड (क) च्या उप खंड (दोन) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याव्दारे, सदर परवानेधारक कंपनीच्या अत्यावश्यक सेवेमध्ये संप करण्यास **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये** सदर आदेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांसाठी प्रतिबंध करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नारायण कराड,**
शासनाचे सहसचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR & MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th May, 2026.

### Order

MAHARASHTRA ESSENTIAL SERVICES MAINTENANCE ACT, 2023.

No. MESMA-0325/CR-110/Energy-4.— Whereas, the Adani Power Maharashtra Limited, Tiroda, District Gondia (hereinafter referred to as 'the said licensee') being a transmission and generation licensee under the provisions of Electricity Act, 2003 (36 of 2003), is engaged in the services connected with the supply of electricity in the State of Maharashtra;

And whereas, employees of the said Licensee are likely to go on strike;

And whereas, any service connected with the supply of electricity is an essential service within the meaning of sub-clause (ii) of clause (a) of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Maharashtra Act No. XXIX of 2023);

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that in the public interest, it is necessary to prohibit strike in the said essential service provided by the said Licensee.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 read with sub-clause (ii) of clause (a) of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Maharashtra Act No. XXIX of 2023), the Government of Maharashtra hereby prohibits strike in the said essential service provided by the said Licensee for a period of six months from the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NARAYAN KARAD,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.